# Academic Year 2023-24

## 7.1.1 Annual gender sensitization action plan




# विद्यार्थिनींनी स्वरक्षणाचे धडे घेणे महत्त्वाचे: सुरेश पाटील



साक्री (अनिल देसले दै. धुळे दवंडी) : जागतिकीकरणामुळे महिलांसमोरील प्रश्नांचे स्वरूप बदलले असून विद्यार्थिनींनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी स्वसंरक्षणाचे धडे घेणे महत्त्वाचे असल्याचे मत विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश पाटील यांनी व्यक्त केले.

महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र शासन, भारतीय स्त्रीशक्ती आणि विद्या विकास मंडळाचे सी गो पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री, युवती सभा आयोजित राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी ते अध्यक्षीय मनोगतात बोलत होते. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षा ताईसो मंगलाताई सुरेश पाटील उपस्थित होत्या. साक्री चे पोलीस निरीक्षक श्री मोतीराम निकम प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. भारतीय स्त्री शक्ती च्या अध्यक्षा सौ कल्पना भागवत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, डॉ भागवत, प्रशिक्षक दृश्यांत राजे देशमुख, अमृत पाटील प्रसंगी उपस्थित होते.

तीन दिवस चालणाऱ्या सदर प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटकीय मनोगतात ताईसो मंगलाताई सुरेश पाटील यांनी आयुष्यात आलेल्या वाईट प्रसंगांच्या विरोधात जाण्यासाठी यासारखे प्रशिक्षण विद्यार्थिनींना महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. साक्रीचे पोलीस निरीक्षक श्री मोतीराम निकम यांनी विद्यार्थिनींना सायबर सुरक्षा विषयी मार्गदर्शन केले. संकटे शक्यतो जोपर्यंत आपण स्वतःहून ओढवून घेत नाही तोपर्यंत ते आपल्याजवळ फिरकत नाही तरीसुद्धा अनहूतपणे आलेल्या संकटांवर विद्यार्थिनी वेळीच सजत राहून मात करावी. योग्य वेळी कुटुंबाची तसेच पोलिसांची मदत घ्यावी असे आव्हान देखील त्यांनी प्रसंगी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ कल्पना भागवत यांनी तर संचलन डॉ ज्योती वाकोडे यांनी केले. तीन दिवस चालणाऱ्या या स्व संरक्षण प्रशिक्षण शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थिनी बहुसंख्येने सहभाग नोंदविला.

दैनिक धुळे दवंडी 26/7/2023

# Academic Year 2023-24

## 7.1.1 Annual gender sensitization action plan






# Academic Year 2023-24

## 7.1.1 Annual gender sensitization action plan




**पुण्य नगरी**

### श्रमसंस्कार, व्यक्तीमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळेचा समारोप



**साक्री** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विद्यार्थी विकास विभाग आणि विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने निजामपूर येथे म्हसाई माता मंदिरात आयोजित तीन दिवशीय विद्यापीठस्तरीय श्रमसंस्कार व्यक्तीमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळेचा समारोप झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ.डी.एल तोरवणे, कबचौ उमवी जळगाव राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.सचिन नांद्रे, मसाई माता चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शहा, उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील, डॉ.रवींद्र ठाकरे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.पंकज अहिरे उपस्थित होते. डॉ.डी.एल. तोरवणे यांनी विद्यार्थ्यांनी आपले मत स्पष्टपणे, ठामपणे मांडण्यासाठी तसेच स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उपलब्ध संसाधनांचा वापर करून नेहमी प्रयत्न रत राहावे असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.अहिरे यांनी मार्गदर्शन केले. डॉ.रवींद्र ठाकरे यांनीही मनोगत व्यक्त केले. तीन दिवशीय कार्यशाळेचा समारोपाचा अहवाल विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.पंकज अहिरे यांनी मांडला. कार्यशाळेतून आलेले अनुभव विद्यार्थ्यांनी मनोगतातून व्यक्त केले. त्यात प्रामुख्याने तेजश्री चौधरी, सौरभ माळी, योगेश कोळपे, निकिता भावसार, योगिता हालोर यांनी अनुभवांचे कथन केले. कार्यशाळेसाठी म्हसाई माता चॅरिटेबल ट्रस्ट,निजामपूर यांनी निवासाची सोय व कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिली.कार्यक्रमाचे संचलन महिला विद्यार्थी विकास अधिकारी ज्योती वाकोडे यांनी तर आभार प्रा.योगेश आहेर यांनी व्यक्त केले. कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.पंकज अहिरे, विद्यार्थी महिला विकास अधिकारी डॉ.ज्योती वाकोडे, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.योगेश आहेर, प्रा.परेश तोरवणे, संयोजन समितीचे सदस्य डॉ.विठ्ठल साळुंखे यांना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. शरद बोरसे, सलोनी देवरे, हितेश साळुंके व क्रांती मोरे यांनी कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यशाळेत विद्यापीठ परिसरातील जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

Smart Dhule Edition
Feb 28, 2024 Page No. 1
Powered by : eReleGo.com